**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**दिनांक २२ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या..**

**1. महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण - सिबीजी २०२६ जाहीर.**

**2. राज्यातील विद्यार्थ्यांना परदेशात रोजगाराच्या संधी वाढाव्यात यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि सीआयआय यांच्यात सामंजस्य करार.**

**3. बुलढाणा जिल्ह्यातील लोणारमध्ये 24 ते 26 एप्रिल दरम्यान 'खगोल दर्शन महोत्सवा'चं आयोजन .**

**4. इराणबरोबरची शस्त्रसंधी अमर्यादित काळासाठी वाढवत असल्याची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा.**

---

मंत्रिमंडळ निर्णय

महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण २०२६ आज राज्य सरकारन जाहीर केलं. आज मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. यासाठी पाचशे कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे घनकचऱ्याचं पर्यावरणपूरक व्यवस्थापन तसंच हरित गृह वायू उत्सर्जन कमी होण्यास मदत होणार आहे. कमाल जमीन धारणा मर्यादा नियमानुसार जमिनीचं रुपांतर भोगवटादार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये करण्यासाठीच्या अधिमूल्याची पुनर्रचना करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. याबाबतची अधिसूचना काढण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. राज्यातल्या सात आदर्श महाविद्यालयातल्या शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार मूळ वेतन देण्याचा निर्णयही झाला आहे. या पदावरल्या शिक्षकांना उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या पद भरतीमधे अतिरिक्त गुण मिळणार आहेत.

---

चंद्रकांत पाटील

राज्यातील विद्यार्थ्यांना परदेशात रोजगाराच्या संधी वाढाव्यात यासाठी जर्मनी, जपान आणि रशिया यांच्या भाषा आणि संस्कृतीचे प्रशिक्षण देण्यावर भर दिला जात आहे, अशी माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. आज मंत्रालयात महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि सीआयआय यांच्यात सामंजस्य करार झाला.

या करारानुसार, सीआयआय “महाराष्ट्र-जर्मनी-जपान कुशल कामगार गतिशीलता” उपक्रमात अंमलबजावणी भागीदार म्हणून काम करणार असून तंत्रशिक्षण मंडळ पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणार आहे. या उपक्रमामुळं विद्यार्थ्यांच्या कौशल्य, संवाद क्षमता आणि आत्मविश्वासात वाढ होऊन जागतिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास मंत्र्यांनी व्यक्त केला.

-------------------------------------------

अमराठी वाहनचालक

महाराष्ट्रात अमराठी रिक्षा, टॅक्सी आणि ॲप-आधारित वाहनचालकांसाठी प्रवाशांशी मराठीत संवाद साधणे अनिवार्य करण्याच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने पावले उचलली आहेत. या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली २४ एप्रिल रोजी विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. वाहनचालकांना मराठी प्रशिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रम तयार करण्यावर भर दिला जाणार असून अंमलबजावणीची रूपरेषा ठरवली जाणार आहे. मराठी भाषेचा सन्मान राखत प्रवासी-वाहनचालक संवाद सुलभ करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

-------------------------------------------

प्रताप सरनाईक

एसटी महामंडळाच्या बसस्थानकं आणि आस्थापनांवर सौरऊर्जा प्रणाली बसवण्याच्या प्रकल्पाचा पहिला टप्पा सुरू झाला असून २ पूर्णांक ५७ मेगावॉट ग्रीड सोलर प्रकल्पास मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी सुमारे १३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून दरवर्षी ३ ते ४ कोटींची वीज बचत होणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

-------------------------------------------

पोटनिवडणूक

बारामती आणि राहुरी या दोन विधानसभा मतदारसंघांतही पोटनिवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. राहुरीत एकूण ३ लाख ३३ हजार ५४५ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारांना सुरक्षित आणि निर्भयपणे मतदान करता यावे यासाठी सर्व ३७४ मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या सर्व केंद्रांवर वेबकास्टिंग द्वारे थेट लक्ष ठेवले जाणार आहे.

-------------------------------------------

मालेगाव बॉम्बस्फोट

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी ४ संशयितांना मुंबई उच्च न्यायालयानं आज दोषमुक्त केलं आणि त्यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करायचा विशेष न्यायालयाने दिलेला

निर्णय रद्दबातल ठरवला. मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या पीठानं हा निर्णय दिला. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात या चौघांविरुद्ध आरोपपत्र करायचे आदेश विशेष न्यायालयानं दिले होते.

-----------------------------------------

बालविवाह

राज्यात अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर, महिला आणि बाल विकास विभागानं 'स्पेशल फोर्स'च्या माध्यमातून मोठी कारवाई करत एकाच दिवशी तब्बल ३२ बालविवाह रोखण्यात यश मिळवलं असल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली..

-----------------------------------------

खगोल दर्शन महोत्सव 2026'

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आणि 'आंतरराष्ट्रीय डार्क स्काय सप्ताहा'च्या पार्श्वभूमीवर, जागतिक वारसा स्थळ असलेल्या लोणार इथं 24 ते 26 एप्रिल दरम्यान 'खगोल दर्शन महोत्सवाचं  आयोजन करण्यात आलं आहे.लोणार सरोवर हे उल्कापातामुळे तयार झालेले जगातील एक अद्वितीय सरोवर आहे. येथील परिसर प्रकाश प्रदूषणापासून मुक्त असल्यानं  'डार्क स्काय' संवर्धनासाठी अत्यंत अनुकूल आहे. या महोत्सवांतर्गत  तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना नक्षत्र, ग्रह आणि ताऱ्यांचे जवळून निरीक्षण करता येईल. प्रकाश प्रदूषणाचे दुष्परिणाम आणि नैसर्गिक अंधाराचे महत्त्व सांगणारे प्रदर्शन आणि माहितीपट दाखवले जातील. निसर्ग संवर्धन आणि विज्ञानाची सांगड घालून खगोल पर्यटनाला चालना देणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

-----------------------------------------

पहलगाम

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या पहिल्या स्मृती दिनानिमित्त पीडितांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.गेल्या वर्षी याच दिवशी पहलगाम इथं दहशतवाद्यांनी 26 पर्यटकांची हत्या केली होती. या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सशस्त्र दलांनी गेल्या वर्षी 6 आणि 7 मेच्या मध्यरात्री ऑपरेशन सिंदूर अंतर्गत नियंत्रण रेषेच्या पलीकडं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीर मधल्या दहशतवाद्यांच्या नऊ छावण्यांवर अचूक मारा केला होता

-----------------------------------------

वसुंधरा दिन

वर्ध्यात जागतिक वसुंधरा दिन आणि  राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंतीनिमित्त निसर्ग सेवा समितीतर्फे पर्यावरण जनजागृती रॅली काढण्यात आली.ऑक्सीजन पार्क येथून सुरू झालेली रॅली शहरातील विविध भागातून मार्गक्रमण करत पार पडली.  रॅलीत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या  चित्ररथातून वृक्षलागवडीचं  महत्त्व अधोरेखित करण्यात आलं .

----------------------------------------

संप

विविध प्रलंबित मागण्यांसाठी मध्यवर्ती राज्य सरकारी कर्मचारी संघटनेनं कालपासून संप पुकारला आहे. या संपात अकोला जिल्ह्यातील कर्मचारी सहभागी झाले आहेत. त्यामुळं जिल्ह्यातील महसूल विभागासह विविध विभागांच्या कार्यालयांतील कामकाज ठप्प झालं आहे.

----------------------------------------

पश्चिम आशिया संघर्ष

इराणसोबतची शस्त्रसंधी अमर्याद काळासाठी वाढवण्यात आल्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. इराणसोबत चर्चा करण्यासाठी हे आवश्यक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. इराणसोबतची दोन आठवड्यांची शस्त्रसंधी आज सकाळी संपली, त्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी ही घोषणा केली आहे. मात्र अमेरिकन नौदल इराणच्या बंदरावरची नाकेबंदी सुरूच ठेवेल असंही त्यांनी स्पष्ट केलं. इराणने शस्त्रसंधीची मुदत वाढवण्याबाबत कसलीही मागणी केली नव्हती असं इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्डशी संबंधित तसनिम वृत्तसंस्थेनेम्हटलं आहे, तसंच बंदरांवरची नाकेबंदी इराण तोडेल असा इशाराही दिला आहे. दरम्यान  इराणचं निमलष्करी दल रिव्हॉल्युशनरी गार्डने आज सकाळी होर्मुजच्या सामुद्रधुनीत दोन मालवाहू जहाजांवर हल्ला केला. यातजीवितहानी झाल्याचं कुठलंही वृत्त नाही. तर हिजबोलानं आज इस्रायलवर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ला केला. इस्रायलने शस्त्रसंधीचं उल्लंघन करत दक्षिण लेबनननमधे हल्ले केल्यानंतर पहिल्यांदाच हा हल्ला केल्याचं हिजबोलानं म्हटलं आहे.

----------------------------------------

राजकुमार बडोले

अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर  सरकारन भूमिका स्पष्ट न केल्यास माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. येत्या २५ एप्रिल रोजी गोंदिया इथं यासाठी आंदोलन आयोजित करण्यात आलं असून सुमारे ७ हजार लोक सहभागी होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. सर्वोच्च

न्यायालयान राज्यांना अधिकार दिल्यानंतरही सरकार ठोस पावले उचलत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

-----------------------------------------

शाळांची वेळ

भंडारा जिल्ह्यात सुरू असलेल्या तीव्र उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीन शाळांच्या वेळेत तात्पुरता बदल करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनानं जारी केले आहेत. जिल्ह्यातील सर्व शासकीय, अनुदानित, खासगी शाळांनी सकाळी ७ ते १० या वेळेतच वर्ग भरवावेत, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------------------------------

हवामान

हवामान - विदर्भात आज चंद्रपूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागान वर्तवली आहे. याशिवाय आज आणि उद्या विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये उष्णतामान 40 अंश सेल्सिअस ते 43 अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. दरम्यान आज नागपुरात ४१ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतकं शुष्क तापमान नोंदवण्यात आलं.

-----------------------------------------

चारधाम यात्रा

केदारनाथ मंदिराचे दरवाजे आज भाविकांसाठी उघडण्यात आले. केदारनाथ आणि चारधाम यात्रा म्हणजे देशाच्या विश्वास, एकता आणि वैभवशाली परंपरेचा आध्यात्मिक महोत्सव असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

-----------------------------------------